साक्षरतेची सुरुवात

मंजिरी निमकर

पहिलीत जाऊन वाचन - लेखन शिकणे ही साक्षरतेची पहिली पायरी आहे असे बरीच वर्षे (भारतात अजूनही) समजले जात असे. परंतु १९७०-२०००च्या काळात प्रारंभिक भाषा शिक्षणाविषयी बरेच संशोधन जगात अनेक ठिकाणी चालू होते. या संशोधनामुळे जगातील बालशिक्षणाचे सारे स्वरूपच पार बदलून गेले आहे.

या पार्श्वभूमीवर भारतातील बालशिक्षणाच्या उत्क्रांतीकडे एक नजर टाकून पुढे जाऊया. १९२०-३०च्या काळात बालशिक्षणाचे स्वरूप गाणी, गोष्टी, गप्पा इतपतच होते. नंतर बालशिक्षण म्हणजे शिक्षणासाठी तयारी करण्याची पायरी असे समजले जाऊ लागले. त्यामुळे वाचन-लेखनपूर्व तयारीवर भर दिला गेला. नंतर ब्लूम, डर्किन इत्यादी अभ्यासकांनी मानवी बुद्धिमत्तेची वाढ प्रामुख्याने वयाच्या पाचव्या वर्षापर्यंत होते असे मत मांडल्यावर मुलाने लिहिण्या-वाचण्याची तयारी दाखवीपर्यंत थांबण्याऐवजी त्याला प्रेरणा देऊन लवकर तयार करण्याचे प्रयत्न जगभराप्रमाणेच भारतात सुरू झाले. दुर्दैवाने या प्रयत्नात रचनावादाच्या* (*मूल स्वतःच्या अनुभवांमधून स्वतःसाठी ज्ञानाची निर्मिती करत असते.) मूलभूत संकल्पनांचे विस्मरण होऊन बालवाडीतच मुलांवर लिहिणे-वाचणे लादले जाऊ लागले आणि भारतात आजही बहुसंख्य बालवाड्यांमध्ये मुले साचेबद्ध शिक्षणाच्या सर्जनविरहित वातावरणात गुदमरून जात आहेत. आता मात्र जगभर चाललेल्या संशोधनातून बाहेर आलेल्या काही नव्या संकल्पनांमुळे आपल्या बालशाळांना नवसंजीवनी देण्याची वेळ आली आहे.

लेखी भाषेवर प्रभुत्व असणे हे बुद्धिमत्तेच्या विकासासाठी व शालेय यशासाठीही गरजेचे आहे. पण म्हणून लेखन-वाचन शिकवायला आपण जितके लवकर सुरुवात करू तितके मूल अधिक वरची प्रभुत्व पातळी मिळवते असे बिलकुलच नसते. उलट बालवाडीतील तीन-चार वर्षाच्या मुलांना 'लिहिणे-वाचणे' शिकविण्याच्या अट्टाहासापायी आपण मुलांच्या नैसर्गिक ऊर्मी, स्वतंत्र विचार करण्याची व शिकण्याची शक्ती दाबून, मारून टाकतो आहोत. लिहिणे-वाचणे एका टप्प्यावर शास्त्रशुद्ध पद्धतीने शिकवावे लागते. कारण तोंडी भाषेसारखे ते केवळ रोजच्या राहण्या-जगण्यातून प्राप्त होत नाही. लेखी भाषेला (लिपीला) नैसर्गिक संदर्भाचा आधार नसतो आणि वाचन-लेखनासाठी एक संपूर्ण नवी सांकेतिक खुणांची व्यवस्था आत्मसात करावी लागते. सध्या मान्य असलेल्या व्यवस्थेपर्यंत



साक्षीच्या चित्राचे फराटे आणि लिखाणाचे फराटे यातला फरक स्पष्ट आहे.

पोचणे मुलाच्या दृष्टीने महत्त्वाचे निश्चितच आहे. परंतु ते मुलात दडलेल्या साक्षरतेच्या अंकुराला जपत, खतपाणी घालून मायेने वाढवत करायला हवे.

मुलाला उपजतच भाषेची समज असते याबद्दल आज कोणाचेच दुमत नाही. भाषेच्या सर्व म्हणजे श्रवण, संभाषण, वाचन, लेखन व विचार या पाचही अंगांची मुलाला उपजतच समज असते असे प्रतिपादन नवे संशोधन करते. जन्मानंतर काही महिन्यांतच मूल तोंडाने जे आवाज काढते त्याला आपण मुलाचे हुंकार म्हणतो. पुढे मुलाच्या एकाक्षरी उद्‌गारांना आपण मुलाचे बोलणे म्हणतो. मुलाने मं मं म्हटल्यावर त्याच्या चेहऱ्यावरील भाव, जेवणाची वेळ इत्यादी संदर्भांवरून त्याला जेवायचे आहे हे आपण समजून घेतो. एवढेच नाही तर 'भूक लागली?' 'भात देऊ?' अशासारखे प्रश्न विचारून मुलांना आणखी बोलायला प्रोत्साहन देतो. न्यूझिलंडमधील एक बालशिक्षिका मरी क्ले आपले निरीक्षण नोंदवितात की साक्षर वातावरणात वाढणारी अगदी लहान मुलेसुद्धा व्यवस्थित पुस्तके हाताळतात. डावीकडून उजवीकडे नजर फिरवतात. खडू किंवा पेन्सिल हातात घेऊन कागदावर एखादा ठिपका काढतात किंवा काहीतरी खूण करतात. क्लेबाई याला मुलांचे वाचन-लेखन म्हणतात.

नुकतेच चालायला शिकलेले मूल दोन पायात अंतर ठेवून अडखळत चालते. त्याला आपण चालणेपूर्व कौशल्य म्हणत नाही तर चालणेच म्हणतो. मुलाच्या मं मं, पा पा यास संभाषणपूर्व कौशल्य न म्हणता 'बोलणे'च म्हणतो. त्याच न्यायाने मुलाच्या पुस्तकात डावीकडून उजवीकडे नजर फिरवणे व कागदावर

ठिपका काढणे याला मुलाची साक्षरताच म्हणायला हवे.

या प्राथमिक टप्प्यावरील मुलांची भाषेची समज जाणून घेऊन तिचा विकास करणाऱ्या बालशाळा आपल्याला उभ्या करायच्या आहेत. बालशिक्षण म्हणजे कुटुंबाबाहेरचा पहिला सामाजिक अनुभव. प्राथमिक शाळेच्या तुलनेत बालशाळेतील वातावरण अधिक अनौपचारिक असते. तेथे मोठ्यांशी आणि समवयस्कांशी संवादातून भाषा व साक्षरतेचा विकास घडविण्याची संधी उपलब्ध होते. 'शिकण्या'चा दबाव न टाकता मुलांना अनुभवातून ज्ञान मिळविण्याची संधी उपलब्ध करून देण्याची हीच जागा आहे. मरी क्ले यांनी म्हटल्याप्रमाणे साक्षर वातावरणातील मुले अधिक लवकर साक्षर होतात. म्हणून बालशाळेत साक्षर परिसर निर्मिती करायला हवी. 'साक्षर परिसर'चा अर्थ भिंतीवर ठिकठिकाणी बाराखडीचे तक्ते लावणे इतका संकुचित नाही. तर साक्षर परिसर म्हणजे तोंडी आणि लेखी भाषेचा जास्तीत जास्त वापर करण्याच्या संधी मुलांना उपलब्ध करून देणारा परिसर.

बहुसंख्य बालशाळांमध्ये एक शिक्षिका आणि बारा-पंधरा मुले समोर बसून शिक्षिके मागून काही म्हणताहेत असे चित्र दिसते. काही आधुनिक बालशाळांमध्ये एक एक मूल एक एक उपक्रम करीत असते. आपले काम झाले की ते पुढच्या उपक्रमाकडे जाते. परंतु परस्पर - संवादाच्या दृष्टीने यातील कुठलीच वर्गरचना फारशी पूरक नसते. त्यासाठी चार-चार मुलांनी लहान-लहान गटात बसून उपक्रम करणे जास्त फायदेशीर असते.

मुलांना दिले जाणारे बहुतेक उपक्रम 'सांगितलेले करा' या प्रकारचे असतात. म्हणजे सारख्या चित्रांच्या जोड्या लावा किंवा क्रमाने लावा किंवा वर्गीकरण करा. या उपक्रमांबरोबर मुलाच्या बुद्धीला चालना देणारे, विचार करायला लावणारे, त्याच्या सृजनशीलतेला वाव देणारे, उपक्रम तयार करायला हवेत. उदाहरणार्थ पांढऱ्या रांगोळीवर एखादा ठोकळा ठेवून त्यावर रंगीत रांगोळी टाकली व नंतर तो ठोकळा उचलला की त्याच्यासारख्या आकाराचा ठसा पांढऱ्या रांगोळीत दिसतो. यात मुलाला वेगवेगळे आकार वापरणे, वेगवेगळे रंग वापरणे, कधी पांढऱ्यावर तर कधी रंगीत रांगोळीवर ठसे उठवणे असे अनेक बदल करून या पूर्ण उपक्रमाविषयी आपला संबोध पक्का करता येतो. असा उपक्रम केवळ पूर्ण करणे हा एकमेव हेतू न ठेवता बालशिक्षिकेने तो भाषाविकासाची संधी म्हणून वापरायला शिकला पाहिजे. 'हे काय आहे?' 'असं करता येईल का?' 'आणखी कसं करता येईल?' अशा प्रकारचे प्रश्न विचारून मुलाला विचार करायला, ते शब्दात मांडायला, कार्यकारण भाव शोधण्याची क्षमता विकसित करायला प्रोत्साहन द्यायला हवे.





वाचन व लेखन ही भाषेची अंगे विकसित करण्यासाठी मुलांना वाचण्या-लिहिण्याच्या भरपूर संधी उपलब्ध करून द्यायला हव्यात. वर्गखोलीत निरनिराळ्या गोष्टींना लेबल्स चिकटवणे, 'चपला येथे काढा' 'डबे कसे छान ठेवले आहेत' यासारख्या सूचना लेखी देणे उपयोगाचे आहे. वर्गात गाण्यांची, गोष्टींची, चित्रांची पुस्तके असणारा एक वाचन कोपरा असावा. पुस्तक कसे धरावे, पान कसे उलटावे हे मुलांना दाखवून दिल्यानंतर मुलांना इच्छेनुसार केव्हाही या कोपऱ्यात जाऊन वाचत बसता आले पाहिजे. या कोपऱ्यात मुलांच्या आवडीच्या गोष्टी-गाणी मोठ्या अक्षरात लिहून लावता येतील. मुलांच्या एखाद्या गटाला मोठ्याने वाचून दाखवण्यासाठी अशा मोठ्या तक्त्यांचा चांगला उपयोग होतो. मुलांना रोज दहा मिनिटे तरी वाचून दाखवलेच पाहिजे. वाचता-वाचता मध्ये प्रश्न विचारून मुलांना गोष्टीत सहभागी करून घेता येते.

वाचन कोपऱ्याबरोबर एक लेखन कोपरा असावा. लेखन कोपऱ्यात पेन्सिल, खडू, स्केचपेन, वेगवेगळ्या रंगाचे व आकाराचे कागद याचा भरपूर पुरवठा असावा. मुलांचे लिखाण फलकावर व्यवस्थित लावून ठेवावे. लिखाणासाठी लिहिलेली आपली नावे मुलांना खूप लवकर वाचता येतात. काही मुले आपल्या मित्रमंडळींना आपले लिखाण वाचून

दाखवतानाही आढळतात. काही सृजनशील मुले आपणहून या कोपऱ्यात जाऊन लिहितात. पण सर्वांसाठी मुद्दाम लिहिण्यासाठी संधी उपलब्ध करून द्याव्यात. कधी पालकांना चिठ्ठी, तर कधी गैरहजर असणाऱ्या आपल्या बाई किंवा मैत्रिणीला पत्र, कधी नुकत्याच झालेल्या एखाद्या सणाबद्दल किंवा सहलीबद्दल माहिती किंवा वर्गातील आमच्या आवडत्या उपक्रमाबद्दल माहिती.

बालशाळेतील प्रत्येक उपक्रम ही भाषा-विकास व समृद्धीची संधी आहे हे प्रत्येक बालशिक्षिकेने विसरता कामा नये. त्यादृष्टीने खाऊ करण्याच्या उपक्रमातही मुलांचा सहभाग केवळ खाणे व चिरणे, किसणे अशा जीवनकौशल्यांपुरता मर्यादित न ठेवता खाऊच्या रेसिपीची चर्चा करणे, त्यावरून आणाव्या लागणाऱ्या वस्तूंची यादी करणे, पालकांना पत्र लिहिणे, खरेदी करणे, पदार्थ कसा बनवला ते लिहिणे अशा अनेक टप्प्यांवर भाषा विकासाच्या संधी उपलब्ध आहेत.

मुलांचे हे सारे लिखाण दिसते कसे? मुले आपल्या प्रमाण सांकेतिक खुणांपेक्षा खूप वेगळे दिसणारे लिहितात. प्रत्येक जण वेगळे लिहिते. ते एका टिंबापासून अगदी अक्षरांसारखे असे काहीही असू शकते. कधीकधी दोन वक्र रेषा काढून, तू काय लिहिलं आहेस असे विचारल्यावर मुले चार-पाच वाक्यांचा एखादा किस्सा सांगतात. मुलांनी आपले लिखाण दाखवायला आणल्यावर 'वा छान!' असे म्हणून कौतुक करून आपले काम संपत नाही. तर तू काय लिहिले आहेस हे विचारायला पाहिजे. त्याने सांगितलेले त्याच्या लिखाणाच्या मागे लिहून घ्यायला हवे, त्याला पुन्हा वाचून दाखवून फलकावर लावायला हवे. त्याच्या पालकांना दाखवायला हवे. मुलांच्या मं मं आणि पा पा चे आपण किती कौतुक करतो ते आठवा आणि तितकेच कौतुक या लिखाणाचेही करायला विसरू नका.

अशा प्रकारच्या साक्षर वातावरणात मुले आवडीने साक्षर बनतात. खूप लहान वयापासून त्यांना लेखी भाषेची असणारी जाण थक्क करून टाकणारी असते. यादी किंवा कवितेमध्ये आखूड ओळी एकाखाली एक लिहिलेल्या असतात याची मुलांना कल्पना असते. चार वर्षाच्या आर्यन सस्तेने कविता लिहिली आहे. तर साडेचार वर्षांच्या सानिकाने मसाले भातासाठी आणायच्या बाजाराची यादी केली आहे.

मराठीत लिहिताना वेगवेगळे शब्द असतात व शब्दांवर रेषा असतात याची मुलांना जाणीव असते. प्रजयने (वय - पाच वर्षे) गॅदरिंगबद्दल घरी पालकांना चिठ्ठी लिहिली आहे. चिठ्ठीत काय लिहायचे हेही स्वातंत्र्य मुलांना आहे हे



मजकुरावरून लक्षात येईल.

कित्येकदा मुलांना अंक काढता येतात पण त्याचा उपयोग ती लेखनातील अक्षरे अथवा शब्द म्हणून करतात. श्रीयाने रजेवर गेलेल्या देवकीताईंना पत्र लिहिले आहे. यात ३, २ यासारख्या अंकाचा वापर केला आहे. तिने म, ट, ब सारखी अक्षरेही वापरली आहेत. मुलांचे चित्र काढतानाचे फराटे आणि लिहितानाचे फराटे अगदी वेगवेगळे दिसतात. पाचव्या नमुन्यात साक्षीने आपल्या झोपडपट्टीचे चित्र काढून काही लिहिले आहे.

या साऱ्या नमुन्यांवरून मुलांची साक्षरता कोणत्या वयापासून सुरू होते याविषयी आपल्याला चांगलीच कल्पना येईल. आपले म्हणणे, विचार, कल्पना दुसऱ्यापर्यंत पोहोचविण्यासाठी मुले जेव्हा लेखी भाषेचा अर्थपूर्ण वापर करू लागतात तेव्हा ती साक्षर झाली असे म्हणायला हरकत नाही.